# काळजी



मालाचे आज शाळेत लक्षच लागत नव्हते. दिवसभर ती मोत्याचाच विचार करत होती. मोती मालाचा कुत्रा होता. मोती अजून छोटे पिलूच होता.

आज सकाळचीच गोष्ट. माला दूध पीत होती. तेव्हा आई म्हणाली, “हा मोती म्हणजे डोकेदुखीच आहे.”

आई पुढे म्हणाली, “मोती त्याच्या वर्गात पासच होत नाहीये. मोतीसाठी आता दुसरे घर शोधायला पाहिजे.” हे ऐकून मालाला फार वाईट वाटले.

मोती खरंच नीट शिकत नव्हता. त्याच्या शिक्षकाने “बैस” म्हणून सांगितले, की हा खारीमागे पळायचा.

शिक्षकाने “इकडे ये” म्हणून सांगितले, की हा एक गिरकीच मारायचा.

शिक्षकाने “थांब” म्हणून सांगितले, की हा मालाच्या अंगावर उड्याच मारायचा. अगदी खोडकर-पणा करायचा.

आज माला दिवसभर याच विचारात होती. संध्याकाळी ती घरी आली. आईला म्हणाली, “मला मोतीची काळजी वाटते. आता मोतीला मीच शिकवणार.

दुसऱ्याच दिवशी मालाने मोतीला शिकवायला सुरुवात केली. एक महिन्यात मोती छान तयार झाला. कुत्र्यांच्या वर्गात छान वागू लागला. आता आई मोतीवर खूष झाली.

~~~

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH
~~~

1. “दिवसभर ती मोत्याचाच विचार करत होती.” या वाक्यात “च” चा अर्थ काय आहे? धड्यातील असे “च” शोधा आणि त्यांच्याभोवती गोल करा. “च” चा वापर करून २ वाक्ये लिहा.

2. खालील शब्द वापरून वाक्ये तयार करा.

लक्ष, विचार, काळजी, अजून, खोडकर

3. मालाने मोतीला शिकवले - बैस, ये, थांब. तुम्ही अजून काय काय शिकवाल? पाच आज्ञा लिहा.

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH

4. शब्दाचे रूप बदला

माला -> मालाचा, बाबा ->

वर्ग -> वर्गात, घर ->

झाड -> झाडावर, टेबल ->

आई -> आईने, आजी ->

आई -> आईला, काकू ->

5. विचार करा आणि सांगा: मालाला कसली काळजी वाटत होती? का?

© Triveni Marathi Shala, Cincinnati, OH